# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई. यांचे कार्यालय

कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.
दुरध्वनी क्रं. ०२२ - २७५६५०८२

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/ २३८३ /सन-२०१७
दिनांक २१/ ८/२०१७

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये तरतूद

२) या कार्यालयाकडील दिनांक ३०/५/२०१७ रोजीचा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ)अन्वये आदेश

२) श्री के डी बोरकर ,उपलेखापरीक्षक यांनी दिनांक २५/६/२०१७ रोजी या कार्यालयात सादर केलेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ)अन्वये तपासणी अहवाल

३) या कार्यालयात दिनांक ११/७/२०१७,२५/७/२०१७,३/८/२०१७ व १०/८/२०१७ रोजी घेण्यात आलेली सुनावणी

ज्याअर्थी, शिवम को ऑप हौसिंग सोसा लि, दत्त मंदीर रोड, कस्तुरी विदयालयासमोर ,भांडुप (प) मुंबई - ७८ (संस्थेच्या नावाने वाचावे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे आणि,

ज्याअर्थी, सदरची गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायदा व मंजूर उपविधीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असल्याने तिचे कामकाज हे सहकारी कायदा व मंजूर उपविधी व सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी पारीत परीपत्रकानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक २ अन्वये श्री के डी बोरकर , उपलेखापरीक्षक यांना सदर संस्थेची तपासणी करण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ)अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले . आणि,

ज्याअर्थी सदंर्भ क्रमांक ३ चे अनुषंगाने श्री बोरकर, तपासणी अधिकारी यांनी तपासणी अहवाल या कार्यालयास दिनांक २५/६/२०१७ रोजी सादर केला आहे .आणि,

त्याअर्थी संस्थेच्या कामकाजातील अनियमिततेबाबत चौकशी करणे आवश्यक आहे याचा विचार करता उपरोक्त संस्थेची कलम ८३ नुसार चौकशी करणे आवश्यक वाटत आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे .

### आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(अ)अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये मी , संध्या बावनकुळे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई , शिवम को ऑप हौसिंग सोसा लि, दत्त मंदीर रोड, कस्तुरी विदयालयासमोर ,भांडुप (प) मुंबई - ७८ या संस्थेची सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मुददयांवर चौकशी करण्याचे आदेश देत असून

Scanned by CamScanner

चौकशी अधिकारी म्हणून श्री सी एच कदम, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांची नियुक्ती करीत आहे .चौकशी अधिकारी यांनी चौकशी पुर्ण करुन तसा अहवाल ३ महिन्याचे आत या कार्यालयास सादर करावा .चौकशी शुल्क म्हणून रक्कम रु २५०००/- कायम करण्यात येत आहे .

सदरचा आदेश मी आज दिनांक २१/८/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे .

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था एस-विभाग मुंबई यांचे कार्यालय

(संध्या बावनकुळे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस-विभाग, मुंबई.

प्रत :-

१) श्री सी एच कदम, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक व चौकशी अधिकारी

२)चेअरमन/सेक्रेटरी, शिवम को ऑप हौसिंग सोसा लि, दत्त मंदीर रोड, कस्तुरी विदयालयासमोर ,भांडुप (प) मुंबई - ७८

२/- यांना कळविण्यात येते की त्यांची चौकशीकामी आवश्यक ती कागदपत्रे चौकशी अधिकारी यांचेकडे सुपूर्द करावीत चौकशीसाठीचा खर्चाचा धनादेश मा.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था (२) पुर्व उपनगरे , मुंबई यांचे नावे जमा करण्यात यावा .

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस-विभाग, मुंबई.

21/8/2017
(C.H. Kadam)

Scanned by CamScanner

# परिशिष्ट अ

**चौकशी मुद्दा क्रमांक १ :-** संस्थेच्या पदाधिका-यांनी मुदत ठेव पावत्या रु.१,११,५६८/- ,रु.२,३३,१३५/- ,रु.२३३,१३५/- व रु.२,३१,३६८/- काढलेले आहेत.त्यापोटी रु.३,९७,९४०/- व ३,५५,२३०/- रक्कम नावे पडलेली आहेत .

**चौकशी मुद्दा क्रमांक २:-** पार्कींग डिपॉझीट रु.४,८६,९४७/- एफ डी रीसीटस नाहीत

**चौकशी मुद्दा क्रमांक ३:-** अेटीसी नेटवर्क रु. १२५००००/- व जीटीएल नेटवर्क रु. ५५००००/- यांचे मुळ व्हाऊचर्स उपलब्ध नाहीत .

(संध्या बावनकुळे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस-विभाग, मुंबई.

Scanned by CamScanner